ePaper

| वर्ष - 6 | अंक - 131 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार | दिनांक 18 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## सध्या दिल्ली दरबारी अनेकजण झुकत आहेत; एकनाथ शिंदे



### आतील पानांत


- राज्यातील राजकीय पेचप्रसंगाच्या प्रकरणात आता नागरिकांचीही याचिका
- आयुक्त पाटलांच्या बदलीने भाजप सुखावली, तर राष्ट्रवादी दुखावली...
- '५० खोके, गद्दार हाय हाय', मुख्यमंत्री शिंदेंसमोर घोषणाबाजी


### आमदार महेश लांडगे संतापले

# पिंपरीतील विकासकामांना विलंब!

## जाणीवपूर्वक वेळकाढूपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची झाडाझडती

**पिंपरी।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**अधिकाऱ्यांनी चालढकल करु नये. तांत्रिक कारणे देत बसू नये. प्रशासक काळात रखडलेली कामे तात्काळ मार्गी लावावी, अशी तंबी त्यांनी दिली. भाजपच्या पिंपरी पालिकेतील सत्ताकाळात सुरु झालेली तथा पूर्णत्वाला आलेली विकासकामे जाणीवपूर्वक रखडवण्यात येत असल्याचा आरोप करत आमदार महेश लांडगे यांनी पालिका अधिकाऱ्यांना पुन्हा धारेवर धरले. अधिकाऱ्यांनी चालढकल करु नये. तांत्रिक कारणे देत बसू नये. प्रशासक काळात रखडलेली कामे तात्काळ मार्गी लावावी,**



**अशी तंबी त्यांनी दिली.**

आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाचे पाणी शहराला मिळण्याबाबत प्रशासनाची संथ कार्यवाही खपवून घेतली जाणार नाही, अशा इशाराही त्यांनी दिला.

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील महत्त्वाच्या कामांचा आढावा घेण्यासाठी आमदार लांडगे यांनी चिंचवडच्या ऑटो क्लस्टर सभागृहात अधिकाऱ्यांची बैठक घेतली. अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, सहशहर अभियंता मकरंद निकम, संजय कुलकर्णी, श्रीकांत सवणे आदी उपस्थित होते. आयुक्त राजेश पाटील बैठकीला उपस्थित नव्हते.

त्रिवेणीनगर येथील रस्त्याचे काम पूर्ण करावे, बाधीत नागरिकांची पुनर्वसन प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी. टाळगाव चिखली येथील जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम तातडीने मार्गी लावावे, टाऊन हॉलच्या कामाला गती द्यावी. चिखली ते चऱ्होली दरम्यान पालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेत गोशाळा विकसित करता येईल का, याबाबत पडताळणी करावी. भोसरी थोरल्या पादूका चौकातील संतशिल्प व म्युरल्सचे काम लवकर पूर्ण करावे. भोसरीत लहान मुलांच्या रुग्णालयाचे नियोजन करावे. भोसरीतील कुस्ती संकुल व कबड्डी संकुलमधील खेळाडूंना राहण्याची सोय व्हावी.

### सर्व्हेक्षण करुन संबंधितांवर दंडात्मक करावी

याकरिता १२० खाटांच्या क्षमतेच्या वसतीगृहाचे काम लवकर करावे. यमुनानगर, निगडी भागातील अनेक घरांवर रेडझोनची मार्किंग दाखवली जात आहे. ती दुरूस्त करुन घ्यावी. संरक्षण विभागाकडून रेडझोनची हद्द निश्चित करावी. आंद्रा, भामा आसखेड प्रकल्प, भूसंपादनाबाबत प्रलंबित प्रकरणे, क्रिकेट स्टेडियम, सफारी पार्क, मोशी आणि पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणासाठी भूसंपादन प्रक्रिया गतीमान करण्यासाठी तसेच चिखली हॉस्पिटल जागेबाबत संबंधित विभागांशी तातडीने बैठक घ्यावी. कॅनबे चौक ते भक्ती-शक्ती चौक हा मार्ग रेडझोन हद्दीतून नव्याने विकसित करण्यासाठी अहवाल सादर करावा. अनेक सोसायट्यांमध्ये मैलाशुध्दीकरण प्रकल्प बंद अवस्थेत आहेत. याबाबत सर्व्हेक्षण करुन संबंधितांवर दंडात्मक करावी. पर्यावरण संवर्धनाला चालना द्यावी, अशा विविध सूचनाही आमदार लांडगे यांनी केल्या आहेत.

# देशाबद्दलचे प्रेम आपल्या कृतीतून दिसले पाहिजे : अजित गव्हाणे

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसतर्फे माजी सैनिकांचा सत्कार

**पिंपरी ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

देश सेवा करणाऱ्या जवानांच्या कार्याची उंची व महत्त्व खूप मोठे आहे. आपले देशाबद्दलचे प्रेम हे काही दिवसांसाठी मर्यादित न ठेवता ते आपल्या कृतीतून नेहमीच दिसले पाहिजे असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी व्यक्त केले. दिघी येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने भारताच्या स्वतंत्रता अमृत महोत्सवा निमित्ताने "जागर राष्ट्रभक्तीच्या जाणीवांचा सन्मान माजी सैनिकांचा" हा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. युवक अध्यक्ष इम्रान शेख यांच्या संकल्पनेतून व माजी नगरसेवक चंद्रकांत वाळके यांचा सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी १५० माजी सैनकांचा सन्मान करण्यात आला. त्यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी बोलताना शहराध्यक्ष अजित गव्हाणे म्हणाले, 75 व्या अमृत महोत्सवी स्वतंत्रता दिना निमित्त शहरात खूप कार्यक्रम झाले. त्यापैकी माजी सैनिकांचा सन्मान करून सर्वात चांगला कार्यक्रम राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून घेण्यात आला आहे. देश सेवा करणाऱ्या जवानांच्या



कार्याची उंची व महत्त्व खूप मोठे आहे. आपण सर्व त्यांच्यासमोर खूप छोटे आहोत. सर्व नागरिकांनी देशाबद्दल प्रेम हे फक्त 26 जानेवारी आणि 15 ऑगस्ट पुरते मर्यादित न ठेवता ते नेहमीच आपल्या कृतीतून दाखवून दिले पाहिजे.

यावेळी बोलताना युवक अध्यक्ष इम्रानभाई शेख म्हणाले "टीव्ही इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या या युगात भारतीय युवक भरकटलेल्या अवस्थेत असून स्वतंत्रता आणि पारतंत्रता याचे फरक युवकांना कळावे व युवकांना देशाप्रति आदर निर्माण व्हावा याच्यासाठी एक छोटासा प्रयत्न म्हणून आम्ही राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून देशासाठी बॉर्डरवर आपल्या जीवाची बाजी लावणारे माजी सैनिक यांना सन्मानित करण्याचे ठरवले. या सन्मान सोहळ्याच्या माध्यमातून माजी सैनिकांचे अनुभव युवकांना ऐकावयास मिळतील या संकल्पनेतून हा कार्यक्रम आम्ही घेतला. फक्त बॉर्डरवर जाऊन देश सेवा करता येत नाही तर सामाजिक कामात भाग घेवून, पर्यावरण जपून, सामान्य नागरिकांच्या मदतीला धावून त्यांचे प्रश्न सोडवून देखील आपल्याला देशसेवा करता येते असे देखील ते यावेळेस म्हणाले.

या सन्मान सोहळ्यास राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, कॅप्टन चव्हाण, कॅप्टन भुसे, युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रसन्न डांगे, निलेश निकाळजे, युवा नेते राहुल पवार, राष्ट्रवादी लीगल सेलचे अध्यक्ष ॲड. सोनाली गाडगे, युवक उपाध्यक्ष प्रकाश डोळस, लवकुश यादव, तुषार ताम्हणे, रोहित वाबळे, सरचिटणीस दीपक गुप्ता, नितीन सूर्यवंशी, अनुज देशमुख, सचिव ओम शिरसागर, निखिल गाडगे, कुणाल जगताप रुबान शेख, अनिल चव्हाण, सुरज बोराटे, नैनिल रुणवाल, व मोठ्या संख्येने राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्यातील राजकीय पेचप्रसंगाच्या प्रकरणात आता नागरिकांचीही याचिका!

## मतदारांचे म्हणणे जाणून घेण्याची सर्वोच्च न्यायालयाकडे विनंती

**।पुणे। महाईन्यूज।**

**राज्यातील राजकीय पेचप्रसंगातून यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या विविध याचिकांमध्ये आता नागरिकांच्या हस्तक्षेप याचिकेचाही समावेश झाला आहे. या प्रकरणामध्ये नागरिकांचेही म्हणणे जाणून घेण्यात यावे, अशी मागणी याचिकेच्या माध्यमातून न्यायालयाकडे करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी, रंजन बेलखोडे, सौरभ अशोकराव ठाकरे (पाटील) यांनी ॲड. असीम सरोदे यांच्या माध्यमातून ही याचिका दाखल केली असून, या प्रकरणातील इतर याचिकांबरोबरच ही याचिकाही २२ ऑगस्टला सुनावणीला घेण्यात येणार आहे.**

नागरिकांची याचिका दाखल करण्याच्या उद्देशाबाबत याचिकाकर्ते डॉ. चौधरी यांनी सांगितले, की भारतीय लोकशाहीची मूलभूत रचना आणि मतदानाचा सन्मान करण्याची जबाबदारी पाळताना राजकीय नेते दिसत नाहीत. राजकीय नेत्यांची अप्रामाणिक आणि बेकायदेशीर वागणूक आता घटनाविरोधी कारवाईच्या वळणावर येऊन ठेपली आहे. दहाव्या परिशिष्टातील उणिवा आणि पक्षांतर बंदी कायद्याच्या तरतुदी संदर्भात सातत्याने स्वत:ला फायदेशीर ठरतील असे अन्वयार्थ राजकीय नेते काढताना दिसतात. पाहिजे तेव्हा कोणत्याही पक्षात जाण्याची अनैतिकता स्थिर प्रशासनाच्या संकल्पनेला धोकादायक आहे. त्यामुळे मतदारांची होणारी फसवणूक आणि मतदारांचे म्हणणे सर्वोच्च न्यायालयाने जाणून घ्यावे, हाच हस्तक्षेप याचिकेमागचा उद्देश आहे. भारतीय संविधानाच्या मूलभूत रचनेला धक्का लागू नये, अशा प्रकारची कोणतीही लोकशाही प्रक्रिया टिकली पाहिजे. मतदानाच्या माध्यमातून निवडणुका पार पडतात आणि लोकशाही कार्यान्वित होते. पण, या प्रक्रियेनंतर मतदारांना क्षुल्लक समजणारे राजकारण चुकीचे आहे, असा मुद्दा याचिकेतून मांडल्याचे सौरभ ठाकरे म्हणाले. एका विशिष्ट पक्षाला पक्षचिन्ह पाहून मतदार मत देत असतील, तर मतदारांनी निवडून दिलेल्या उमेदवारांनी मध्येच पक्ष बदलण्याच्या आणि त्यांची निष्ठा इतर राजकीय पक्षाप्रति व्यक्त करण्याच्या प्रवृत्तीबाबत मतदारांनी नागरिक म्हणून नंतर काहीच बोलू नये, ही लोकशाहीतील कमतरता आम्ही न्यायालयात मांडणार असल्याचे बेलखेडे यांनी सांगितले.



**भारतीय लोकशाहीची मूलभूत रचना आणि मतदानाचा सन्मान करण्याची जबाबदारी पाळताना राजकीय नेते दिसत नाहीत. राजकीय नेत्यांची अप्रामाणिक आणि बेकायदेशीर वागणूक आता घटनाविरोधी कारवाईच्या वळणावर येऊन ठेपली आहे. दहाव्या परिशिष्टातील उणिवा आणि पक्षांतर बंदी कायद्याच्या तरतुदी संदर्भात सातत्याने स्वत:ला फायदेशीर ठरतील असे अन्वयार्थ राजकीय नेते काढताना दिसतात. पाहिजे तेव्हा कोणत्याही पक्षात जाण्याची अनैतिकता स्थिर प्रशासनाच्या संकल्पनेला धोकादायक आहे. त्यामुळे मतदारांची होणारी फसवणूक आणि मतदारांचे म्हणणे सर्वोच्च न्यायालयाने जाणून घ्यावे, हाच हस्तक्षेप याचिकेमागचा उद्देश आहे.**

---

# यंदा दहीहंडीला दणदणाट, शहरभर फ्लेक्सबाजी, लाखोंचा खर्च!




**पुणे । महाईन्यूज ।**

दहीहंडीच्या माध्यमातून आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांकडून शक्तिप्रदर्शन करण्यात येणार असून शहरभर दहीहंडी साजरी करणाऱ्या मंडळांनी फ्लेक्स लावले आहेत. सार्वजनिक सण, उत्सवावर असलेले निर्बंध मागे घेण्यात आल्यानंतर यंदा दहीहंडीचा उत्सव सार्वजनिक स्वरूपात मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येणार आहे. दहीहंडीच्या माध्यमातून आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांकडून शक्तिप्रदर्शन करण्यात येणार असून शहरभर दहीहंडी साजरी करणाऱ्या मंडळांनी फ्लेक्स लावले आहेत. सिनेतारकांची उपस्थिती, दहीहंडी पथकांवर देण्यात येणरी बक्षिसे, रोषणाईवर लाखो रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. करोना संसर्गामुळे गेले दोन वर्षे सार्वजनिक उत्सवांवर निर्बंध होते. राज्य शासनाने सार्वजनिक सणांवरील निर्बंध मागे घेतल्यानंतर यंदा दहीहंडी आणि गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांनी तयारी सुरू केली आहे. दहीहंडी उत्सव येत्या शुक्रवारी (१९ ऑगस्ट) साजरा करण्यात येणार आहे. आगामी महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून इच्छुकांनी तयारी सुरू केली आहे. दहीहंडी आणि गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांना भरीव सहाय करण्यासाठी इच्छुक आघाडीवर असून दहीहंडी उत्सवापूर्वी शहरभर फ्लेक्सबाजी करण्यात आली आहे.

# विविध जातीधर्मातील प्रतिष्ठीतांच्या सहभागाने भारताचा 76 वा स्वातंत्र्यदिन साजरा

## समिता स्पोर्ट्स फाउंडेशन तर्फे कार्यक्रमाचे आयोजन

**वाकड । । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शहरातील समिता स्पोर्ट्स फाउंडेशन तर्फे भारताचा 76 वा स्वातंत्र्यदिन विविध जातीधर्मातील प्रतिष्ठीतांच्या सहभागाने साजरा करण्यात आला. राज्य पुरस्कारार्थी ज्येष्ठ साहित्यिक तथा आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते प्रभाकर ओव्हाळ, वाकड मस्जिद ट्रस्टचे विश्वस्त शब्बीरभाई शेख, बायबल सोसायटी ऑफ इंडियाचे बोर्ड डायरेक्टर आणि ख्रिश्चन एकता मंच (महाराष्ट्र राज्य) माजी अध्यक्ष महेश बेंजामिन, सामाजिक कार्यकर्त्या सौ.मोनिका बेंजामिन, वाकड थेरगाव येथील दंततज्ज्ञ डॉ. नुपूर तिवारी(झारखंड कन्या) तसेच माळी समाजातील कार्यकर्त्या समिता राजेंद्र गोरे आणि मराठी मुस्लिम मंचचे अध्यक्ष अमिन खान यांच्या हस्ते एकत्रितपणे सोमवारी (15 ऑगस्ट) ध्वजारोहण करण्यात आले.




वाकड पिंकसिटी रोडवरील पलाश प्लस कॉम्प्लेक्स मधील समिता स्पोर्ट्स फाउंडेशनच्या कार्यालयाच्या प्रांगणात तिरंगा सकाळी आठ वाजता फडकविण्यात आला. यावेळी पिस्टल शूटिंग ज्युनिअर राष्ट्रीय खेळाडू भगिनी केतकी गोरे व कस्तुरी गोरे, चित्रिकरण दिग्दर्शक सिकंदर खान, सुतार समाजातील कार्यकर्ते महेश भागीवंत आदि मान्यवर उपस्थित होते.

भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास सर्व प्रांतातील आणि जातीधर्मातील एकजुटीच्या विजयाचे जगातील एकमेव उदाहरण असून ती एकता, समता, बंधुता टिकविण्याचे सामर्थ्य भारतीयांमध्ये असल्याचे ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ यांनी सांगितले. भारताचे स्वातंत्र्य चिरायू होवो. अशा सदिच्छा शब्बीरभाई शेख यांनी व्यक्त केल्या. स्वतंत्र राष्ट्रासमोरही अनेक आव्हाने असतात त्याचा संदर्भ देत महेश बेंजामिन यांनी देशाला भ्रष्टाचारमुक्तीसाठी स्वातंत्र्य संग्रामासारखा लढा उभारावा लागेल असे सांगितले. यावेळी समिता गोरे यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत उपस्थितांचे आभार मानले.

# आयुक्त पाटलांच्या बदलीने भाजप सुखावली, तर राष्ट्रवादी दुखावली..!

## सत्ताधाऱ्यांची लुडबूड सहन करीत नव्हते आयुक्त राजेश पाटील

**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त यांचीही अपेक्षेनुसार काल बदली झाली. ती पालिकेत पुन्हा सत्तेत येण्यासाठी कंबर कसलेल्या भाजपच्या (BJP) पथ्यावर पडणार आहे. तर, २०१७ ला गेलेली पालिकेची १५ वर्षांची सत्ता पुन्हा मिळवण्याचा जोरदार प्रयत्न करीत असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्यादृष्टीने ती अडचणीची ठरणार आहे. कारण त्यांची पालिकेत सत्तेत येण्याची वाट या बदलीतून आता आणखी बिकट होणार आहे.**

दरम्यान, बदली झालेले पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त राजेश पाटील हे २००५ च्या आयएएस बॅचचे म्हणजे १७ वर्षाच्या सेवेचा अनुभव असलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी आहेत. तर, त्यांच्या जागी नियुक्ती झालेले शेखर सिंह हे २०१२ च्या आयएएस बॅचचे आहेत. परिणामी क मधून ब श्रेणीत आल्यानंतर पिंपरी पालिका आयुक्तपदाचा दर्जाही सचिव पातळीपर्यंत उन्नत झाला होता. मावळते आयुक्त पाटील यांनाही तो होता. मात्र, नवे आयुक्त शेखरसिंह हे त्यांच्यापेक्षा सात वर्षांनी कनिष्ठ असल्याने पालिका आयुक्तपदाची श्रेणी आता पुन्हा अवनत करण्यात आली आहे. सचिवपदावरून सहसचिव अशी ती गेली आहे. त्याला पालिकेच्या प्रशासन विभागातून आज दुजोरा देण्यात आला.

पालिकेची मुदत १३ मार्चला संपल्याने पाटील यांना सध्या गेले पाच महिने विना राजकीय हस्तक्षेप





पालिकेची सार्वत्रिक निवडणूक होऊ घातली आहे. त्यात पुन्हा सत्तेत येण्यास पाटील यांचा अडसर भाजपला वाटत होता. कारण पाटील यांना पिंपरीत तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी आणले होते. त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादीच्या सोईची प्रभागरचना केल्याचे भाजपचे म्हणणे होते. त्या प्रभागरचना व पद्धतीने (तीन सदस्यीय) पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी भाजपला तारेवरची कसरत पिंपरीतच नाही, तर पुण्यासह इतर पालिकांत करावी लागणार होती. म्हणून राज्यात पुन्हा सत्तेत येताच त्यांनी तीनचा प्रभाग बदलून तो पुन्हा चारचा केला. त्यानंतर दुसरा अडथळा आयुक्तांचा दूर केला. परिणामी २०२२ ला (आता २०२३ उजाडेल बहूधा) शंभर प्लसचा दिलेला नारा खरा होईल,असा विश्वास भाजपला आता वाटू लागला आहे

कारभार करता येत होता. तशीही ते त्याअगोदरही सत्ताधाऱ्यांची लुडबूड सहन करीत नव्हते. बेकायदेशीर कामांना सहसा धारा देत नव्हते. स्थायीने मंजूर केलेले टक्केवारीचे विषय लगेचच अंमलात आणत नव्हते. अगोदरच्या आयुक्तांप्रमाणे ते वागत नसल्याने सत्ताधाऱ्यांचे गुलाम, घरगडी, कठपुतळी असे त्यांना म्हणण्याची विरोधकांची बिशाद झाली नव्हती. त्यांची पाटीलकी निर्वेधपणे सुरुच होती. त्यामुळे सत्ताबदल होताच त्यांना जावे लागले.

कारण पालिकेतील सत्ताधारी भाजपच्या मनाप्रमाणे न वागल्याने त्यांच्या रोषाला ते बळी पडले होते. दुसरं म्हणजे पालिकेची सार्वत्रिक निवडणूक होऊ घातली आहे. त्यात पुन्हा सत्तेत येण्यास पाटील यांचा अडसर भाजपला वाटत होता. कारण पाटील यांना पिंपरीत तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी आणले होते. त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादीच्या सोईची प्रभागरचना केल्याचे भाजपचे म्हणणे होते. त्या प्रभागरचना व पद्धतीने (तीन सदस्यीय) पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी भाजपला तारेवरची कसरत पिंपरीतच नाही, तर पुण्यासह इतर पालिकांत करावी लागणार होती. म्हणून राज्यात पुन्हा सत्तेत येताच त्यांनी तीनचा प्रभाग बदलून तो पुन्हा चारचा केला. त्यानंतर दुसरा अडथळा आयुक्तांचा दूर केला. परिणामी २०२२ ला (आता २०२३ उजाडेल बहूधा) शंभर प्लसचा दिलेला नारा खरा होईल,असा विश्वास भाजपला आता वाटू लागला आहे

# आयुक्त राजेश पाटील यांची बदली सुडबुध्दीने : सचिन चिखले

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निर्णयाचा तीव्र निषेध

**पिंपरी। ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त राजेश पाटील यांची राज्यातील सरकारने सुडबुध्दीने बदली केली आहे. अवघ्या दीड वर्षाच्या कार्यकाळात आयुक्त पाटील यांनी शहराला शिस्त लावण्यापासून ते जनहिताचे प्रकल्प मार्गी लावण्यापर्यंतचे निर्णय घेतला. सत्तेचा दुरुपयोग करून अशा प्रकारे कर्तव्यदक्ष आयुक्तांची बदली करणे लोकशाहीला पायदळी तुडवणारे आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या निर्णयाचा तिव्र निषेध करत आहे, अशा शब्दांत मनसेचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी आयुक्तांच्या बदलीला विरोध दर्शविला आहे.

ओडिशा केडरचे 2005 च्या बॅचचे आयएएस राजेश पाटील यांची आंतरराज्य प्रतिनियुक्तीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तपदी 15 फेब्रुवारी 2021 रोजी नियुक्ती झाली. अवघे दीड वर्षच त्यांना पिंपरी-चिंचवडमध्ये काम करता आले. राज्यात महाविकास आघाडीची सत्ता जाऊन शिंदे-फडणवीस सरकारची सत्ता आली. सत्ताबदल होताच आयुक्त पाटील यांच्या बदलीचा निर्णय घेण्यात आला. एकप्रकारे सत्तेचा दुरुपयोग करून ही बदली करण्यात आली, असा आरोप चिखले यांनी केला आहे.

अवघ्या दीड वर्षाच्या कार्यकाळात आयुक्तांनी पिंपरी-चिंचवड शहराला वेगळी शिस्त





### सत्ताबदल होताच आयुक्त पाटील यांच्या बदलीचा निर्णय

**ओडिशा केडरचे 2005 च्या बॅचचे आयएएस राजेश पाटील यांची आंतरराज्य प्रतिनियुक्तीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तपदी 15 फेब्रुवारी 2021 रोजी नियुक्ती झाली. अवघे दीड वर्षच त्यांना पिंपरी-चिंचवडमध्ये काम करता आले.**

**राज्यात महाविकास आघाडीची सत्ता जाऊन शिंदे-फडणवीस सरकारची सत्ता आली. सत्ताबदल होताच आयुक्त पाटील यांच्या बदलीचा निर्णय घेण्यात आला. एकप्रकारे सत्तेचा दुरुपयोग करून ही बदली करण्यात आली, असा आरोप चिखले यांनी केला आहे.**

लावण्याचा प्रयत्न केला. गेल्या पाच वर्षात रखडलेल्या विकास प्रकल्पांना गती देण्याचे काम त्यांनी केले. स्मार्ट सिटीतील अर्धवट प्रकल्प पूर्ण करण्यास त्यांनी महत्वाचे निर्णय घेतले. नदी सुधार प्रकल्पाला चालना देण्याचे काम केले. अंध्रा धरणातून 100 एमएलडी पाणी शहरात आणण्यासाठी भूमिगत जलवाहिनी प्रकल्पाला देखील आयुक्तांनी गती दिली. त्यामुळेच हा प्रकल्प आज पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात आला आहे, असे चिखले यांनी म्हटले आहे.

स्वच्छ भारत अभियान राबवून देखील शहरात कच-याची समस्या मोठ्या प्रमाणावर उद्भवली. पुन्हा नव्याने प्लॉगेथॉन मोहिमेंतर्गत स्वच्छता अभियान राबविण्याची भूमिका आयुक्तांनी घेतली. ते स्वतः अभियानात सहभागी होऊन स्वच्छतेला चालणा देण्यासाठी प्रयत्नवादी राहिले. स्मार्ट सिटीतील प्रकल्प देखील मार्गी लावण्याच्या दृष्टीने त्यांनी महत्वाचे निर्णय घेतले. अशा कर्तव्यदक्ष आयुक्तांची तडकाफडकी बदली करणे शहराच्या दृष्टीने घातक आहे. शहराला शिस्त लावण्यात आयुक्त पाटील यांचे निर्णय महत्वपूर्ण ठरले आहेत. तीन वर्षासाठी त्यांची नियुक्ती केलेली असताना सरकारने त्यांची बदली करून पिंपरी-चिंचवडकरांवर अन्याय केला आहे. मनसे आयुक्तांच्या बदलीचा निषेध

## संपादकीय »

# ओसंडून वाहणारा आशावाद!

***स्वातंत्र्यदिनी पंतप्रधानांनी केलेल्या भाषणाचे खरे तर विश्लेषण करणे अयोग्य. कारण त्यातून आशावाद ओसंडून वाहत असतो आणि आनंदाने ओसंडणाऱ्या आशावादाची मोजमापे काढणे अन्यायकारकच. त्यात यंदा तर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव.***

त्यामुळे तर विश्लेषण आणि विच्छेदन अगदीच अयोग्य. या अमृतकालीन आशावादाच्या कंपनलहरी मोजूमापू नयेत अशाच. तथापि या भाषणात पंतप्रधानांनी कालबद्ध विधान केले असल्याने त्याचे मापन आणि तदनुषंगिक मोजमाप करणे क्रमप्राप्त ठरते. पंतप्रधानांचे हे विधान देश विकसित होण्याबाबत आहे. भारतीय स्वातंत्र्याची शताब्दी होईल तोपर्यंत, म्हणजे २०४७ पर्यंत, देशाचे वर्गीकरण 'विकसनशील'तेतून 'विकसित' गटात झालेले असेल, असा त्यांच्या म्हणण्याचा सूर. म्हणजे या मार्गक्रमणासाठी आपल्या हाती जेमतेम २५ वर्षे आहेत. तेव्हा काळ-काम-वेग यांचे त्राशिक मांडून या साध्यप्राप्तीसाठी नक्की काय करावे लागेल याचा अंदाज बांधता येईल. वास्तविक यंदाचे वर्ष खरे तर पंतप्रधानांनी काही वर्षांपूर्वी ठेवलेल्या लक्ष्यपूर्तीचे. विद्यमान २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होईल अशी घोषणा पंतप्रधानांनी केली होती. त्या घोषणेबरहुकूम घटना घडल्या नसाव्यात. अन्यथा उद्दिष्टपूर्ती दणक्यात साजरी केली गेली असती. पण तसे काही होताना दिसत नाही, याचा अर्थ सुज्ञांनी समजून घेतलेला बरा. आगामी २५ वर्षांच्या साध्याची चर्चा करण्याआधी या वास्तवाची जाणीव असणे आवश्यक. त्यामुळे काही एक समान पार्श्वभूमी तयार होते. त्यानंतर आता विकसनशील ते विकसित या टप्प्याचा आढावा घेता येईल.

यातील पहिले आव्हान म्हणजे अर्थातच एकंदर अर्थव्यवस्था आणि दरडोई उत्पन्न यांचे. या दोन्हींत पुढील २५ वर्षांत किती वाढ व्हायला हवी, याची काही गोळाबेरीज यानिमित्ताने करता येईल. सध्या आपल्या अर्थव्यवस्थेचा आकार आहे जेमतेम ३.१ लाख कोटी डॉलर इतका. आपल्या शेजारील चीनची अर्थव्यवस्था आकाराने तीनपट मोठी आहे आणि अमेरिकेची दहापट. 'पर्चेसिंग पॉवर पॅरिटी'च्या (नागरिकांस जीवनावश्यक काही समान घटकांच्या खरेदीसाठी त्या त्या देशात किती पैसे लागतात याचा ठोकताळा म्हणजे पीपीपी) निकषानुसार मोजू गेल्यास भारताचे दरडोई वर्षिक उत्पन्न साधारण ६.५ ते ७ हजार डॉलर्सच्या घरात आहे. म्हणजे चीनच्या तुलनेत निम्म्याहून कमी. काही विकसित देशांत हेच उत्पन्न आपल्या दहापट अधिक आहे आणि श्रीमंत देशांबाबत तर तुलनादेखील करणे अन्याय्य ठरेल इतके ते अधिक आहे. 'मानवी विकास निर्देशांक' (ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स) हा आणखी एक देशांची प्रगती मोजण्याचा मापदंड. प्रत्येक देशातील नागरिकांस उपलब्ध असलेल्या विकाससंधी, दरडोई गुंतवणूक आदी अनेक घटकांनी हा निर्देशांक मोजला जातो. या निर्देशांकानुसार १८९ देशांच्या रांगेत आपले स्थान १३१ वे आहे.



## आनंदी सकाळ

# कबीरांचा कठोरपणे सत्याचा आविष्कार

कबीर क्रांतिकारी संत होते. आपण अनुभवलेला दिव्य आनंद ते इतरांनाही वाटत असत. निर्भय कबीरांनी कठोरपणे सत्याचा आविष्कार करताना इतरांना काय वाटेल, याची भीड बाळगली नाही. सत्याविरुद्ध जे जे आढळले, त्याचे खंडन करताना त्यांनी कडक भाषा वापरली. धर्ममार्तंड कबीरांविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले. त्यांचा छळ करण्यासाठी सत्ता, अधिकार, प्रतिष्ठा, पांडित्य सर्व काही पणाला लावले. त्यांच्यावर बहिष्कार टाकला, उपासमार केली, धमक्या दिल्या, मारहाण केली. सर्वांभूती राम पाहणारे कबीर शांतिब्रह्म होते. कितीही विरोध झाला, तरी त्यांची चित्तवृत्ती शांत व प्रसन्नच राहिली. दुष्टांनी कबीरांना छळाबळाने नष्ट करण्याचा प्रयत्न केला. काशीमध्ये त्यांना गंगेत साखळदंडांनी बांधून फेकून दिले. आश्चर्य असे, की साखळदंड तुटले आणि कबीर सुखरूप किनाऱ्याला लागले. छळ करणाऱ्यांना वाटले, कबीरांना चेटुकबिटुक येत असले पाहिजे, म्हणून हा असे चमत्कार करतो.




# ध्वनिप्रदूषणाविरोधातील लढाई



झऱ्याची झुळझुळ, पक्ष्यांचा कलरव, मंद आवाजातले संगीत हे सर्व आपल्याला हवेहवेसे वाटते. तेच डीजेची धडाडधूम असेल, तर आपल्याला कानात बोटे घालावीशी वाटतात. या धडाडधूम आवाजाने चांगल्या तब्येतीच्या माणसाला नीट झोप लागत नाही, आजारी माणसे आणि तान्ही बाळे अस्वस्थ होतात आणि जेथे अशा प्रकाराचा मोठ्या पट्टीतला आवाज सातत्याने येतो, तेथील लोकांना ऐन तारुण्यातही बहिरेपणा येतो, रक्तदाबाचे विकार जडतात, हृदयविकाराला तोंड द्यावे लागते आणि आणखीन काही ना काही व्याधी जडतात. हे सर्व पाहून एक डॉक्टर आपले चांगले चाललेले रुग्णालय बंद करून, केवळ ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठीच आयुष्य खर्ची घालतात, हे ऐकल्यास आपला विश्वास बसणार नाही. त्याच लढाईचे पुस्तक 'कॉम्बटिंग कॅकोफोनी' नावाने प्रकाशित करण्यात आले.

विलेपार्ल्यात राहणारे डॉ. यशवंत ओक यांनी आपले चांगले चालते रुग्णालय बंद केले आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन कायदे करून घेतले. आता आपल्याला रात्री १० ते सकाळी सहापर्यंत शांत झोप लागू शकते. या सगळ्या लढाईची कहाणी त्यांनी 'कॉम्बटिंग कॅकोफोनी' या पुस्तकात सविस्तरपणे मांडली आहे. माणूस एकदम शांततेच्या जागी जाऊन बसल्यास अस्वस्थ होतो. त्याला आवाजाची इतकी सवय झालेली असते, की तो जणू त्याच्याशिवाय राहूच शकत नाही. माणसे गमतीने सांगतात, की दादरला रेल्वेरुळालगत राहणाऱ्यांना रात्री दोन ते चार झोप येत नाही; कारण तेव्हा लोकल गाड्या आणि बाहेरगावी जाणाऱ्या गाड्यांची ये-जा बंद असते. बाकीच्या वेळेत ते ढाराढूर झोपू शकतात; कारण तो आवाज त्यांच्या रक्तात गेलेला असतो. रडणारे तान्हे मूल आईने छातीशी धरले, की रडायचे थांबते; कारण त्याला आईच्या हृदयाचे ठोके ऐकू येतात. आईच्या पोटात नऊ महिने असताना, त्याला त्या लयीची सवय झालेली असते.

सार्वजनिक ठिकाणी जीवघेणे आवाज कुठेकुठे होत असतात, याची यादी वाचल्यास नवल वाटेल. विमानतळ, कारखाने, घरे बांधण्याच्या जागी, वर्दळीच्या रस्त्यावरील वाहनांचे आवाज, समुद्रातील जहाजांची ये-जा, दिवाळीतील फटाके, गणेशोत्सव-नवरात्र-मोहरमच्या मिरवणुकी आणि दांडीया नाच, गावागावांत साजरे होणारे लग्न समारंभ, निवडणुका जिंकल्यावर निघणाऱ्या मिरवणुका, जत्रेतील देवांच्या पालख्या हे व असे अनेक. तरुणांना आवाजाची नशा असते; पण त्या काही तासांच्या मौजेची किंमत त्यांना आयुष्यभर द्यावी लागते, हे गावीही नसते.

# उद्‌घोष राष्ट्रीय स्वप्नांचा...

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेले नववे भाषण होते. यंदा स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव असल्याने या सोहळ्याला; तसेच भाषणालाही वेगळे महत्त्व होते. '**

घरोघरी तिरंगा' ही मोहीम चालू करून मोदींनी यंदाचे वेगळेपण आधीच सूचित केले. ते वेगळेपण लाल किल्ल्याची खास सजावट, समोर भारताचा नकाशा केलेले प्रत्येक राज्यातील युवक-युवती आणि स्वत: मोदींचे व्यापक पटावरचे भाषण यांनी अधोरेखित केले. पंतप्रधानांच्या भाषणाचा पट मोठा असला, तरी त्याचा गोळीबंद सारांश काढायचा झाल्याल भविष्यातला 'राष्ट्रीय कार्यक्रम म्हणजे अजेंडा' आणि प्रत्येक भारतीयाचे अपेक्षित 'राष्ट्रीय चारित्र्य' या दोनच शब्दावलींमध्ये काढता येईल. अर्थात, कोणताही नेता मग ते लाल किल्यावर बोलणारे पंतप्रधान का असेना; त्यांच्या वागण्या-बोलण्याला एक राजकीय आंतरसंहिता, म्हणजे 'सबटेक्स्ट' असतेच. ती इतकी स्पष्ट होती, की भाषणानंतर काही तासांतच काँग्रेसच्या प्रभारी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी 'स्वातंत्र्य चळवळीचे सुमारीकरण केले जात' असल्याची टीका केली. राहुल गांधी यांनी कोणतीही प्रतिक्रिया न देता



केवळ सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. या भाषणाला चिकटून येणाऱ्या राजकारणाचा विचार करावा लागेलच; मात्र त्या पलीकडे पंतप्रधान मांडत असलेले मुद्दे भारताच्या भविष्यातील वाटचालीला उपकारक होते की नाही, याचा वस्तुनिष्ठ परामर्श घेणे आवश्यक आहे.

तंत्रज्ञानाच्या साह्याने थेट अनुदान पोहोचल्याने दोन लाख कोटी रुपयांचा गैरव्यवहार वाचल्याचा दावा मोदींनी केला. ही रक्कम मोठी आहे; मात्र आजही आपले सार्वजनिक जीवन व व्यवहार भ्रष्टाचारमुक्त झालेले नाहीत. त्यामुळेच त्यांनी त्याचा उल्लेख 'दीमक' म्हणजे वाळवी अशा शब्दात केला. तो खरा आहे. त्यांनी मांडलेला दुसरा मुद्दा घराणेशाहीचा. 'मी हे केवळ राजकारणासाठी बोलत नाही. सर्वच क्षेत्रांतील घराणेशाहीमुळे होतकरू तरुणांचा मनोभंग होतो. ते निराश होतात,' असे मोदी म्हणाले. हेही खरेच आहे. घराणेशाही म्हणजे केवळ कोणताही पक्ष किंवा संघटना ताब्यात ठेवणारे घराणे असा धरून चालणार नाही. हाती छोटी सत्ता आली, तरी ती आपल्याच घरात ठेवण्याची धडपड म्हणजे घराणेशाही. आपण लोकशाही जपली; मात्र देशभरातल्या साध्या खासगी विश्वस्त संस्था म्हणजे ट्रस्टचा विचार केला, तरी तेथे घराणेशाही कशी चालते, याची शेकडो उदाहरणे देता येतील. हेच धंद्यात. हेच उद्योगांमध्ये आणि तेच सार्वजनिक जीवनातील कलेसहित प्रत्येक क्षेत्रात. पंतप्रधानांनी खास उल्लेख केलेल्या स्त्रीशक्तीच्या सन्मानाच्या आड जशी काही वेळा भारतीय कुटुंबव्यवस्था येते; तशीच जिथे तिथे घराणेशाही चालविण्यातही याच कुटुंबसंस्थेचा मोठा वाटा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती ।
जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ॥१॥
भाडेकरी वाहे पाठीवरी भार ।
अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### “दहशतवाद आणि ब्लॅकमेलिंग हा भाजपाचा मुख्य व्यवसाय” नाना पटोलेंची बोचरी टीका!



। मुंबई ।।महाईन्यूज ।

ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स सारख्या केंद्रीय तपास यंत्रणांची भीती घालण्याचा प्रकार भारतीय जनता पार्टीकडून सातत्याने केला जात आहे. मागील सात-आठ वर्षातील भाजपा नेत्यांची विधाने पाहिली तर विरोधकांना घाबरवण्यासाठी, त्यांचा आवाज बंद करण्यासाठी ते कारवायांच्या धमक्या देत असतात. भाजपाचा आता दहशतवाद आणि ब्लॅकमेलिंग हा मुख्य व्यवसाय झाला आहे. परंतु लोकशाहीत हे फार काळ टिकणार नाही, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधीमंडळ परिसरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना नाना पटोले म्हणाले की, दहशत, भय आणि भूक या सर्व गोष्टी घेऊन केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पार्टी केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करत आहे.

# ‘50 खोके, एकदम ओक्के!!’ गद्दार हाय हाय’, मुख्यमंत्री शिंदेंसमोर घोषणाबाजी

## आदित्य ठाकरेंचं मोठं विधान, म्हणाले “हे बेईमानांचं सरकार...”

।मुंबई ।महाईन्यूज ।

सत्तांतरानंतरचे राज्य विधिमंडळाचे पहिले अधिवेशन आजपासून सुरू झालं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारची अधिवेशनात कसोटी लागणार आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधक आक्रमक झाले असून विधानभवनाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. ‘५० खोके, गद्दार हाय हाय’ अशा घोषणा देत विरोधकांनी शिंदे गटातील सत्ताधारी आमदारांना लक्ष्य केलं. दरम्यान आदित्य ठाकरे यांनी यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना हे सरकार लवकरच कोसळणार असल्याचा दावा केला आहे.

विधानभवनाच्या पायऱ्यांवर घोषणा देणाऱ्यांमध्ये शिवसेनेचे आमदार आदित्य ठाकरेदेखील सहभागी झाले होते. गद्दारी करुन राज्यात सरकार आल्याचे पोस्टर यावेळी झळकावण्यात आले. यावेळी आदित्य ठाकरेंनी आम्ही गद्दार सरकारचा विरोध करत असल्याचं म्हटलं. “ज्यांनी लोकशाहीचा खून केला त्यांच्याविरोधात आम्ही उभे असून, हे गद्दार सरकार असून कोसळणारच,” असा दावा आदित्य ठाकरेंनी केली. हे सरकार घटनाबाह्य, बेकायदेशीर आणि बेईमानांचं सरकार असून नक्की कोसळणार असंही ते म्हणाले. महाराष्ट्राच्या संस्कृतीत, राजकारणात याआधी गुंडगिरीची भाषा वापरली जात नव्हती. ज्या नव्या पक्षात ते जाऊ इच्छित आहेत, तिथे ही भाषा मान्य आहे का?,” अशी विचारणा यावेळी आदित्य ठाकरेंनी केली. “मुख्यमंत्री किंवा खरे मुख्यमंत्री यांचा अंकुश राहिला नसल्यानेच गुंडगिरीची भाषा वापरली जात आहे,” असं आदित्य म्हणाले.



मी काही राजीनामा मागणार नाही, पण जनता यांना याचं स्थान दाखवून देईल. ही गुंडांची भाषा असून, महाराष्ट्रात गुंडांना स्थान नाही अशी टीका यावेळी त्यांनी केली. जनतेला धमकावणारे आमदार असे उघडपणे फिरणार असतील, तर यापुढे राज्यात कायदा सुव्यवस्थेची काय अवस्था होईल याचा अंदाज येतो असंही ते म्हणाले.

### धनंजय मुंडे यांचीही टीका

**“अशाप्रकारे एखादं ट्रीट करुन विरोधी पक्षाला बदनाम करण्याचा आणि त्यांना दाबण्याचा प्रयत्न करणं हे त्यांचं धोरण आहे. पण विरोधी पक्ष अशा कोणत्याही गोष्टीला घाबरणार नाही. महाविकास आघाडी एकजुटीने शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आंदोलन करत आहे,” असं राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यावेळी म्हणाले.**

# शिंदे-फडणवीस सरकारच्या पहिल्याच अधिवेशनात २५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

।मुंबई ।महाईन्यूज ।





शिंदे-फडणवीस सरकारने पहिल्या अधिवेशनातच तब्बल २५ हजार ८२६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. पुरवणी मागण्यांमध्ये कर्जाची नियमित परतफेड करणा-या शेतक-यांना ५० हजार रूपये अनुदान देण्यासाठी ४ हजार ७०० कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र अतिवृष्टी व पूरग्रस्तांच्या मदतीसाठी कुठलीही तरतूद करण्यात आलेली नाही. महविकास आघाडी सरकारने एसटीसाठी केलेली १००० कोटींची तरतूद पुरवणी मागण्यांतही करण्यात आली असून मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षासाठी ७५ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली आहे.

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन बुधवारी सुरू झाले. पहिल्या दिवशी पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या असल्या तरी राज्यातील अनेक जिल्हयांत अतिवृष्टी व पूरस्थिती निर्माण झाली असून तब्बल १५ लाख हेक्टर पीकांचे नुकसान झाले आहे. नुकसानीचा आकडा आणखी वाढू शकेल असे खुद्द मुख्यमंत्री शिंदे यांनीच सांगितले असताना पुरवणी मागण्यांत शेतक-यांच्या मदतीसाठी तरतूद करण्यात आली नाही.

२०१९ साली शेतक-यांच्या कर्जमाफीची महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती योजना मागच्या सरकारने जाहीर केली होती. यावेळी कर्जाची नियमित परतफेड करणा-या शेतक-यांनाही २५ हजार रूपयांची मदत करण्याची घोषणा केली होती. मात्र कोविड व त्यामुळे आलेल्या आर्थिक संकटामुळे प्रत्यक्षात ही मदत देण्यात आली नव्हती. २०२२-२३ चा अर्थसंकल्प सादर करताना तत्कालीन अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या आर्थिक वर्षांत ही मदत करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार शिंदे-फडणवीस सरकारने शेतक-यांना ५० हजार रूपयांची मदत जाहीर केली आहे.

# विनायक मेटेंच्या अपघाताची सीआयडी चौकशी होणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आदेश

।मुंबई ।महाईन्यूज ।



शिवसंग्रामचे अध्यक्ष विनायक मेटे यांचा रविवारी पहाटे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर मोटार अपघातात मृत्यू झाला.

शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष आणि माजी आमदार विनायक मेटे यांच्या अपघाताची सीआयडी चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांना या प्रकरणाच्या तपासानंतर निष्कर्ष सादर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

मराठा समाजाचे नेते अशी ओळख असलेल्या विनायक मेटे यांच्या गाडीला १४ ऑगस्ट रोजी पहाटे पाच वाजता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर भीषण अपघात झाला होता. या अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी तातडीने नवी मुंबईतील एम.जी.एम रुग्णालयात भेट दिली होती. मेटेंच्या मृत्यूची सखोल चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना जाहीर केले होते. दरम्यान, याप्रकरणी मेटेंच्या गाडी चालकाची चौकशी करण्यात आली आहे. विनायक मेटेंच्या पत्नी ज्योती यांनी चालकासंदर्भात बोलताना केलेले विधान प्रकरणाचे गूढ वाढवणारे आहे. चालक अपघाताचे ठिकाण सांगत नव्हता, असे ज्योती यांनी म्हटले आहे. सत्य लपवण्याचा प्रयत्न होतोय, असा आरोपही त्यांनी केला होता.

## शॉर्ट न्यूज »

### सिंचन घोटाळ्यात अजित पवारांना क्लीन चिट मिळालीच नाही?

।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

भारतीय जनता पार्टीचे नेते मोहित कंबोज यांनी मंगळवारी रात्री काही ट्विट्स करून सिंचन घोटाळ्याची पुन्हा चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. कंबोज यांच्या ट्वीटमुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापलं आहे. असं असताना आता अजित पवार यांना सिंचन घोटाळ्यात अद्याप पूर्णपणे क्लीन चिट मिळाली नसल्याची माहिती समोर आली आहे. २०१९ मध्ये एसीबीनं दिलेल्या क्लीन चिटबाबतचा अहवाल मुंबई उच्च न्यायालयाने अद्याप स्वीकारला नसल्याची बाब समोर आली आहे. संबंधित अहवाल मागील दोन वर्षांपासून मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचं वृत्त 'एबीपी माझा'नं दिलं आहे. यामुळे आता अजित पवारांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. एबीपी माझानं दिलेल्या वृत्तानुसार, २०१९ मध्ये अजित पवार यांना सिंचन घोटाळ्यात एसीबीनं क्लीन चिट दिली होती.

# सोमय्यांचा आरोप लावण्याचा स्टॉक संपला

## कंबोज यांच्या ट्वीटवरून भास्कर जाधवांचा भाजपाला टोला



### नौटंकीबाज मोहित कंबोजला पुढे आणले - जाधव

"भाजपाचे नेता किरीट सोमैया हे मराठी लोकांवर भ्रष्टाचाराचे आरोप लावतात. मात्र, हे आरोप लावता लावला सोमैयांजवळचा स्टॉक आता संपला आहे. त्यामुळे नौटंकी करणाऱ्या मोहीत कंबोज या नव्या माणसाला पुढं आणण्यात आलं आहे. मात्र, जो अन्याय आणि ईडीच्या कारवाया आमच्यावर होत आहे, महाराष्ट्राची जनता हे सर्व बघत आहे आणि जनताच त्यांना उत्तर देईन", अशी प्रतिक्रिया भास्कर जाधव यांनी दिली आहे.

नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

भाजपा नेते मोहित कंबोज यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एक मोठा नेता लवकरच तुरुंगात जाणार असल्याचा दावा केल्याने खळबळ उडाली आहे. यावरून राजकीय वातावरण चांगलंच तापलं असून अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांनी मोहित कंबोज यांच्या वक्तव्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. दरम्यान, कंबोज यांच्या ट्वीटवर शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी प्रतिक्रिया दिली आहे. किरीट सोमय्या यांचा स्टॉक संपला असल्याने मोहीत कंबोज या नौटंकीबाज व्यक्तीला पुढे आणण्यात येत असल्याचं, ते म्हणाले. काय म्हणाले भास्कर जाधव?

"भाजपाचे नेता किरीट सोमैया हे मराठी लोकांवर भ्रष्टाचाराचे आरोप लावतात. मात्र, हे आरोप लावता लावला सोमैयांजवळचा स्टॉक आता संपला आहे. त्यामुळे नौटंकी करणाऱ्या मोहीत कंबोज या नव्या माणसाला पुढं आणण्यात आलं आहे.

मात्र, जो अन्याय आणि ईडीच्या कारवाया आमच्यावर होत आहे, महाराष्ट्राची जनता हे सर्व बघत आहे आणि जनताच त्यांना उत्तर देईन", अशी प्रतिक्रिया भास्कर जाधव यांनी दिली आहे.

मोहित कंबोज यांनी मंगळवारी काही ट्वीट केले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एक मोठा नेता लवकरच तुरुंगात नवाब मलिक आणि अनिल देशमुख यांना भेटणार आहे, असं दावा त्यांनी केला होता. या ट्वीटमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. आणखी एक ट्वीट करत कंबोज यांनी सिंचन घोटाळ्याची पुन्हा एकदा चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटलं की, "२०१९ मध्ये परमबीर सिंह यांनी बंद केलेल्या सिंचन घोटाळ्याचा तपास पुन्हा एकदा सुरू करण्यात यावा."

# देवेंद्र फडणवीस राष्ट्रीय राजकारणात? भाजपाकडून मोठी जबाबदारी



नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

भाजपाध्यक्ष जे पी नड्डा यांनी पक्षाचं संसदीय मंडळ आणि केंद्रीय निवडणूक समिती नव्याने तयार केली आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते शिवराज सिंग चौहान आणि नितीन गडकरी यांना यामधून वगळण्यात आलं आहे. जे पी नड्डा संसदीय मंडळाचे आणि भाजपाच्या निवडणूक समितीचे अध्यक्ष असतील. विशेष बाब म्हणजे निवडणूक समितीमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे देवेंद्र फडणवीसांच्या राष्ट्रीय राजकारणातील प्रवेशाची चर्चा रंगली आहे. भाजपाच्या संसदीय मंडळात काही नवीन नावांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी एस येडियुरप्पा, सुधा यादव, इक्बाल सिंग लालपूरा, सर्बानंद सोनेवाल, के लक्ष्मण आणि सत्यनारायण जातिया यांचा दरम्यान निवडणूक समितीमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्यासहित भूपेंद्र यादव आणि ओम माथूर या दोन नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. शाहनवाज हुसेन यांना निवडणूक समितीमध्ये स्थान मिळालेलं नाही. दुसरीकडे सोनेवाल आणि येडियुरप्पा यांना दोन्ही ठिकाणी स्थान मिळालं आहे समावेश आहे. येडियुरप्पा, सत्यनारायण जातिया आणि के लक्ष्मण यांना संधी देत भाजपाने आपण आपले जुने कार्यकर्ते आणि त्यांच्या अनुभवाचा किती आदर करतो हे दाखवून दिल्याचं भाजपा सूत्रांचं म्हणणं आहे.

# भारताने आक्षेप घेतलेले चिनी जहाज अखेर श्रीलंकेत

। कोलंबो । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।



श्रीलंकेच्या हंबन्टोटा या बंदरात चीनचे उच्च तंत्रज्ञानयुक्त संशोधन कार्य करणारे जहाज 'युआन वँग ५' मंगळवारी पोहोचले. या जहाजाच्या श्रीलंकेच्या बंदरातील वास्तव्याला भारताने आक्षेप घेतला होता. त्यामुळे हेरगिरी होण्याची शक्यता असल्याचे भारताचे म्हणणे आहे. भारताच्या आक्षेपामुळे श्रीलंकेने चीनला या जहाजाचे आगमन स्थगित करण्यास सांगितले होते. मात्र, नंतर या जहाजाच्या आगमनास श्रीलंकेकडून शनिवारी परवानगी देण्यात आली होती.

या जहाजातील उच्च तंत्रज्ञानामुळे उपग्रह, आंतरखंडीय क्षेपणास्त्रांचा माग काढता (ट्रॅकिंग) येतो. हे जहाज श्रीलंकेच्या दक्षिण भागातील हंबन्टोटा या बंदरात स्थानिक वेळेनुसार सकाळी आठ वाजून २० मिनिटांनी पोहोचले. या बंदरात त्याचे २२ ऑगस्टपर्यंत वास्तव्य असेल. हे जहाज ११ ऑगस्टला येथे पोहोचणे अपेक्षित होते. मात्र, श्रीलंकेच्या प्रशासनाकडून परवानगीस विलंब झाल्याने त्याच्या आगमनासही उशीर झाला. सुरक्षाविषयक चिंता व्यक्त करून भारताने श्रीलंकेवर विनाकारण आणलेला दबाव निर्थक असल्याची टीका चीनने केली होती. त्यानंतर श्रीलंका सरकारने भारत व चीनशी उच्चस्तरीय चर्चा केली.

# ...तर मी राजकारण सोडून नितीश कुमारांना आपला नेता म्हणून स्वीकारेन!

## प्रशांत किशोर यांचं मोठं विधान

### तेजस्वी यादव आणि नितीश कुमार

बिहार राज्यातील राजकीय वातावरण पूर्ण ढवळून निघालं. नितीश कुमार यांनी आरजेडीचाय पाठिंब्याने राज्यत नवीन सरकार स्थापन केले. नितीश कुमार यांनी बिहारचे मुख्यमंत्री म्ह्णून तर तेजस्वी यादव यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. कालच नितीश कुमार मंत्रिमंडळाचा शपथविधी सुद्धा झाला. ज्यामध्ये आरजेडीच्या १६ मंत्र्यांना स्थान मिळाले आहे. दरम्यान भाजपसोबत असलेली युती तोडत नितीश कुमार यांनी आरजेडी सोबत हातमिळवणी करत राज्यात नवीन सरकार स्थापन केले. नितीश कुमार आणि तेजस्वी यादव यांचावर मात्र विरोधकांकडून टीका करण्यात येत आहे. बिहारचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे दोघंही सध्या विरोधकांच्या निशाण्यावर आहेत आणि अशातच प्रशांत किशोर यांच्या विधानाने अनेक चर्चा रंगत आहेत.

।नवी दिल्ली । ।महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

बिहार राज्यातसुद्धा महाराष्ट्राप्रमाणेच राजकारण ढवळून निघाले नितीश कुमार यांनी भाजपची साथ सोडून आरजेडी सोबर हातमिळवणी करत राज्यात सत्ता स्थापन केली नितीश कुमार यांनी बिहारचे मुख्यमंत्री म्हणून तर तेजस्वी यादव यांनी बिहारचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. यानंतर नितीश कुमार यांना टीकेला समोती जावं लागतं आहे. अशातच राजकीय रणनीतिकर अशी ओळख असलेले प्रशांत किशोरयांनी केलेलं विधान सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. बिहारमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत



यावरूनच प्रशांत किशोर यांनी एक मोठं विधान केलं आहे. विधानसभा निवडणूका येण्याआधी नितीश कुमारअनेकदा भूमिका बदलताना दिसतील असा खोचक टोला प्रशांत किशोर यांनी नितीश कुमार यांना लगावला.

त्याचबरोबर येत्या तीन वर्षात दहा लाख नोकऱ्या जर का नितीश कुमार यांनी दिल्या तर मी राजकारण सोडून देईन आणि नितीश कुमार यांना आपला नेता म्हणून स्वीकारेन असं म्हणत प्रशांत किशोर यांनी थेट आव्हानंच दिलं आहे. याच संदर्भात राजकीय रणनीतिकार प्रशांत किशोर पत्रकार परिषद देत म्हणाले. 'नितीश कुमार हे फेविकॉल सारखे खुर्चीला चिकटून बसले आहेत. जर का नितीश कुमार यांनी तीन वर्षांत यांनी दहा लाख नोकऱ्या दिल्या तर मी राजकारण सोडून देईन आणि नितीश कुमार यांना आपला नेता म्हणून स्वीकारेन. त्याच बरोबर बिहारच्या जनतेच्या डोळ्यात नितीश कुमार धूळफेक करत आहेत. ते आगामी विधानसभा निवडणूक येईपर्यंत नितीश कुमार अनेकदा पलटी मारताना दिसतील' असंही प्रशांत किशोर म्हणाले.

# सचिन पिळगावकर अर्धांगिनी नावाने पत्नी सुप्रियाला देतात हाक, वाढदिवसाच्या निमित्ताने झाला खुलासा

मराठी तसेच हिंदी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते सचिन पिळगावकर यांना ओळखले जाते. मनोरंजन विश्वातील सुप्रसिद्ध अभिनेते म्हणून त्यांची गणना केली जाते. सिनेसृष्टीतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक अशी ओळख असलेले सचिन पिळगावकर यांचा आज वाढदिवस आहे. विशेष म्हणजे सचिन यांच्यासोबतच त्यांची पत्नी आणि प्रसिद्ध अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर यांचाही आज वाढदिवस असतो. सुप्रिया पिळगावकरांच्या वाढदिवसानिमित्त सचिन पिळगावकरांनी त्यांना खास शुभेच्छा दिल्या आहेत.

सचिन पिळगावकर हे सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतात. ते नेहमी विविध फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असतात.



हे फोटो शेअर करताना सचिन पिळगावकर म्हणाले, “माझ्या अर्धांगिनीला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. वाढदिवसाच्या शुभेच्छा सुपर. माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे सुप्रिया पिळगावकर.” विशेष म्हणजे सुप्रिया पिळगावकर यांनीही त्यांच्या या पोस्टवर कमेंट करत उत्तर दिले आहे. “खूप खूप धन्यवाद”, असे त्यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले आहे. दरम्यान मराठीतील अत्यंत लोकप्रिय जोडी अशी अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर आणि सचिन पिळगांवकर यांची ओळख आहे. या जोडीने मराठी पडदा गाजवला आहे. त्यांनी त्यांच्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांची मने जिंकली. तसेच त्यांच्या हृदयात एक विशेष स्थान निर्माण केले. सचिन पिळगावकर यांच्या दिग्दर्शनात साकारलेल्या ‘अशी ही बनवाबनवी’ या चित्रपटात अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, प्रिया अरुण, सुप्रिया पिळगावकर आणि इतरही बऱ्याच कलाकारांचा सहभाग होता. सचिन पिळगावकर आणि सुप्रिया यांनी ‘अशी ही बनवा बनवी’, ‘माझा पती करोडपती’, ‘आयत्या घरत घरोबा’, ‘नवरा माझा नवसाचा’, ‘आम्ही सातपूते’ यासह अनेक चित्रपटांमध्ये स्क्रीन शेअर केली आहे.

# जॉन अब्राहम दिसणार नव्या भूमिकेत

काल स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर एकापाठोपाठ एक नवीन चित्रपटांची घोषणा वेगवेगळे कलाकार आणि निर्मात्यांकडून करण्यात येत होती. बॉलिवूडचा ॲक्शन किंग अशी ओळख असणाऱ्या अभिनेता जॉन अब्राहमनेही त्याच्या आगामी चित्रपटाचे पहिले पोस्टर शेअर करत नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. हे त्याने त्याच्या चाहत्यांना दिलेलं एक मोठं सरप्राईज आहे असंच म्हणावं लागेल. जॉनने स्वातंत्र्यदिनाचे अवचित्य साधून चाहत्यांना त्याचा आगामी चित्रपट ‘तारिक’बद्दल माहिती दिली आहे. सोशल मिडियावर या चित्रपटाचं एक पोस्टर जॉनने शेअर केलं आहे. या पोस्टरच्या कॅप्शनमध्ये जॉनने लिहिले की, ‘आझादी की ‘तारिक’, १५ ऑगस्ट २०२३...’बाटला हाऊस’ आणि ‘तेहरान’नंतर आता ‘तारिक’... बेक माय केक फिल्म्ससोबत आमचा पुढचा पुढील चित्रपट...चांगल्या कथा सांगण्याच्या स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करण्याची हीच ती वेळ. ’ दिग्दर्शक अरुण गोपालन या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. तर चित्रपटाची निर्मिती जॉन अब्राहम, संदीप आणि शोभना यादव करत आहेत. हे पोस्टर पाहून जॉनचा हा पुढचा चित्रपटदेखील देशभक्तीचे उदाहरण म्हणून आपल्या समोर येणार आहे हे प्रेक्षकांसमोर उघड झाले आहे. जॉन अब्राहमची निर्मिती असलेला हा चित्रपट पुढील वर्षी १५ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.यापूर्वी जॉनने परमाणु, सत्यमेव जयते, सत्यमेव जयते २ यांसारख्या चित्रपटातून आपली देशभक्ती समोर आणत प्रेक्षकांना भारावून टाकले होते. त्याच्या या तिन्ही चित्रपटांना प्रेक्षकांनी खूप चांगला प्रतिसाद डिल होता. हे तिन्ही चित्रपट प्रेक्षकांना आवडल्यामुळे ते आता जॉनच्या तारिक चित्रपटासाठी आतुर झाले आहेत.



# जॅकलिन फर्नांडिस हिच्या अडचणीत पुन्हा एकदा वाढ



आयकर विभागानं २१५ कोटी रुपयांच्या खंडणी प्रकरणी जॅकलिनला आरोपी बनवले आहे. ईडीकडून आज जॅकलिनविरोधात आरोपपत्र दाखल केले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसचं नाव २०० कोटींच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात चांगलेच चर्चेत आहे. ठग सुकेश चंद्रशेखर यांच्याशी तिचे नाव जोडलं गेले होते. यामुळे जॅकलिन ही आयकर विभागाच्या रडारवर होती. या काळात जॅकलिनची कसून चौकशी देखील झाली होती. मात्र स्वतःवर लावण्यात आलेल्या आरोपांचं जॅकलिननं खंडन केलं होतं. तर दुसरीकडे सुकेश हा गुन्हेगार आणि खंडणीखोर असल्याची माहिती जॅकलिनला यापूर्वीच होती, असा दावा ईडीने केला आहे. जॅकलिन फर्नांडिसचे सुकेश चंद्रशेखरसोबतचे अनेक कनेक्शन समोर आले आहेत. त्यामुळे ती कायदेशीर अडचणीत सापडली आहे. ईडीने यापूर्वीही २१५ कोटी रुपयांचा खंडणीचा आरोप केला होता. त्यानंतर आज ईडी तिच्याविरोधात आरोपपत्र दाखल करणार आहे.

# शहनाझ गिल पुन्हा प्रेमात?



शहनाझ गिल पुन्हा प्रेमात असल्याचं बोललं जात असून तिचं नाव एका अभिनेत्याशी जोडलं जात आहे. अभिनेत्री शहनाझ गिलला पंजाबची कतरीना कैफ म्हणून ओळखलं जातं. ‘बिग बॉस’मधून प्रसिद्धीच्या झोतात आलेली शहनाझ गिल सोशल मीडियावर बरीच सक्रिय असते. बिग बॉसमध्ये असताना आणि त्यानंतर शहनाझचं खासगी आयुष्य आणि सिद्धार्थ शुक्लाशी असलेली तिची मैत्री बरीच गाजली होती. शहनाझ लवकरच सलमान खानच्या ‘कभी ईद कभी दिवाली’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पण यासोबतच पुन्हा एकदा ती तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. शहनाझ गिल पुन्हा प्रेमात असल्याचं बोललं जात असून तिचं नाव एका अभिनेत्याशी जोडलं जात आहे. शहनाझ गिल सलमान खानच्या ‘कभी ईद कभी दिवाली’ चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. याच चित्रपटातून प्रसिद्ध डान्सर राघव जुयालदेखील बॉलिवूडमध्ये पाऊल टाकणार आहे. दोघंही सलमानच्या चित्रपटाचा महत्त्वाचा भाग आहेत. पण आता काही मीडिया रिपोर्टनुसार शहनाझ आणि राघव यांच्यात मैत्री पलिकडे काही असल्याचं बोललं जात आहे. दोघांमध्ये जवळीक वाढली असून अनेकदा त्यांनी सार्वजनिक ठिकाणी एकत्र पाहिलं गेलंय.

# “आता यांना धडा शिकवायलाच हवा...”


अभिनेता अर्जुन कपूर बॉलिवूडच्या उत्तम अभिनेत्यांपैकी एक मानला जातो. अर्जुनने २०१२ मध्ये परिणिती चोप्रासह ‘इश्कजादे’ चित्रपटातून आपल्या बॉलिवूड करिअरची सुरुवात केली होती. अर्जुन कपूर सोशल मीडियावर बराच सक्रिय असतो आणि त्याचा सोशल मीडियावर बराच मोठा चाहतावर्ग आहे. अर्जुन कपूर नेहमीच एखाद्या विषयावर आपलं मत स्पष्टपणे मांडताना दिसतो. बिनधास्त स्वभाव आणि बेधडक वक्तव्यांसाठी ओळखला जाणाऱ्या अर्जुन कपूरनं नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत बॉलिवूड चित्रपटांच्या विरोधात सोशल मीडियावर सुरू असलेल्या ‘बॉयकॉट’ ट्रेंडवर संताप व्यक्त केला आहे.

आमिर खानचा ‘लाल सिंग चड्ढा’ आणि अक्षय कुमारचा ‘रक्षा बंधन’ या चित्रपटांच्या विरोधात सोशल मीडियावर ‘बॉयकॉट’ ट्रेंड सुरू आहे. सध्या सोशल मीडियावर याचीच चर्चा होताना दिसत आहे. नुकतंच ‘बॉलिवूड हंगामा’ला दिलेल्या मुलाखतीत अर्जुनने यावर प्रतिक्रिया दिली आहे. अर्जुनच्या मते आता या सर्व गोष्टींचा अतिरेक होत आहे. अर्जुन म्हणाला, “मला वाटतं आम्ही याबाबत गप्प राहून चूक केली आहे. आम्ही शांत राहिलो याचाच लोकांनी जास्त फायदा घेतला आहे.”



## शॉर्ट न्यूज »

### आई-वडिलांचे कष्ट प्रेरणादायी! : संकेत



**पुणे। महाईन्यूज**

'संकेत पान टपरी' ते राष्ट्रकुल पदक विजेता हा सारा प्रवास कठीण होता. या प्रवासात साथ देणारे आणि मला इथपर्यंत आणण्यासाठी खस्ता खाणारे आई-वडीलच माझ्यासाठी खरे प्रेरणास्रोत असल्याचे वेटलिफ्टिंगमधील राष्ट्रकुल रौप्यपदक विजेता संकेत सरगरने 'लोकसत्ता'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. स्पर्धा सुरू असतानाच झालेल्या कोपराच्या दुखापतीमुळे संकेतला सुवर्णपदकापासून वंचित रहावे लागले. त्यानंतर संकेतच्या हातावर लंडनमध्येच शस्त्रक्रिया करण्यात आली. संकेत सध्या मुंबईत रिलायन्स हॉस्पिटलमध्ये पुढील उपचार घेत आहे. "वडिलांना खेळाडू व्हायचे होते. परिस्थितीमुळे त्यांना जमले नाही. त्यांचे स्वप्न मी पूर्ण करावे, अशी त्यांची इच्छा होती. त्यांचे कष्ट मी पाहात होतो. कुटुंब चालवत असताना त्यांची होत असलेली ओढाताण बघत होतो.

# येत्या पाच वर्षांत होणार तब्बल 777 क्रिकेट सामने

### आयसीसीने जाहीर केले पुरुष क्रिकेटचे वेळापत्रक

**। नवी दिल्ली। महाईन्यूज ।**



आगामी पाच वर्षांमध्ये क्रिकेट चाहत्यांना मोठी पर्वणी मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आंतरराष्ट्रीय सामन्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आयसीसीने पुरुष क्रिकेटच्या पुढील टप्प्याचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे. २०२१ ते २०१७ या कालावधीत १२ देशांदरम्यान तिन्ही फॉरमॅटमध्ये ७७७ आंतरराष्ट्रीय सामने खेळवले जातील. यामध्ये १७३ कसोटी, २८१ एकदिवसीय आणि ३२३ टी-२० सामने होणार आहेत. सध्याच्या टप्प्यातील सामन्यांपेक्षा पुढील टप्प्यातील सामन्यांची संख्या जास्त आहे.

द्विपक्षीय मालिकांव्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय क्रिकेट कॅलेंडरमध्ये मोठ्या स्पर्धांचाही समावेश करण्यात आलेला आहे. पुढील वर्षी भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकापासून याची सुरुवात होईल. त्यानंतर २०१४ मध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिका संयुक्तपणे टी २० विश्वचषकाचे आयोजिन करणार आहेत. पाकिस्तान २०२५ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन करेल. तर, २०२६ मध्ये भारत आणि श्रीलंका एकत्रित टी २० विश्वचषकाचे यजमानपद भूषवणार आहे. २०२७ मध्ये, दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया संयुक्तपणे विश्वचषक आयोजित करणार आहेत. आयसीसीच्या वेळापत्रकाचे वैशिष्ट्य म्हणजे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेतील सामन्यांची संख्या आहे. आगामी टप्प्यात दोन्ही संघ दोन कसोटी मालिका खेळणार आहेत. पण, यावेळी सामन्यांची संख्या चारवरून पाच करण्यात आली आहे. म्हणजेच दोन्ही संघ आता प्रत्येक पाच-पाच सामन्यांच्या कसोटी मालिका खेळतील. यातील एक मालिका २०२३-२४ मध्ये ऑस्ट्रेलियात होईल. तर, दुसरी मालिका २०२५-२६मध्ये भारतात होईल.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळण्याची ही ३० वर्षांतील पहिलीच वेळ असेल.

# १७ वर्षांखालील महिला फुटबॉल विश्वचषकाचे भवितव्य अधांतरीच

### सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पुढे ढकलली

**।सिनसिनाटी। महाईन्यूज ।**



आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाने (फिफा) अखिल भारतीय फुटबॉल महासंघावर (एआयएफएफ) निलंबनाची कारवाई केली आहे. भारतीय फुटबॉलसाठी हा मोठा धक्का आहे. या कारवाईमुळे भारतात होणाऱ्या १७ वर्षांखालील महिला विश्वचषक स्पर्धेचे भवितव्य अधांतरी लटकले आहे. एआयएफएफ निवडणुकांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहचलेले आहे. त्यावर आज (बुधवार) सुनावणी झाली. मात्र, अद्याप या प्रकरणाबाबत तोडगा निघाला नाही. सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी २२ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलली आहे.

बंदीची कारवाई झाल्यानंतर काही तासांतच प्रशासकांच्या समितीने (COA) फिफाच्या अटींनुसार अखिल भारतीय फुटबॉल महासंघाची निवडणुक घेण्यास सहमती दर्शविली आहे. आज या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. मंगळवारी (१६ ऑगस्ट) केंद्राने सर्वोच्च न्यायालयाकडे या प्रकरणावर लवकरात लवकर सुनावणी करण्याची मागणी केली होती. "फिफाने बंदीची कारवाई केल्यानंतर केंद्राने या प्रकरणाचा तिढा सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. सर्व प्रकरण कशाप्रकारे सुरळीत मार्गी लावता येईल, याबाबत केंद्राने काही मुद्दे फिफाकडे मांडले आहेत. प्रशासकांच्या समितीने देखील यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे," अशी माहिती केंद्राची बाजू मांडणारे सेक्रेटरी जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयात दिली. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे, "१७ वर्षांखालील मुलींचा विश्वचषक ही खेळाडूंसाठी फार चांगली संधी आहे. ही स्पर्धा भारतातच व्हावी, हे आमचे मुख्य लक्ष आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ ऑगस्टला घेतली जाईल. आठवडाभरात काही सकारात्मक घडामोडी होतील, अशी आशा आहे."

**महाईन्यूज**
**जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क**
**708 309 8763**

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही